# जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद
## अदालत रोड, औरंगाबाद 431 001

## निविदा सुचना

मा. जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद येथील एकुण 41 खुर्च्या खराब झालेल्या असुन त्यांची दुरुस्ती करणे तसेच त्याचे हायड्रोलिक बदलणे याकरिता स्थानिक बाजारपेठेतुन मोहरबंद निविदा / दरपत्रके दिनांक – 02/01/2025 ते दिनांक – 03/01/2025 या कालावधीत मागविण्यात येत आहेत. तरी निविदाकारांनी सदरील हे अत्यावश्यक बाब म्हणुन मागविण्यात येत आहेत.

मोहरबंद निविदा / दरपत्रके दिनांक 03/01/2025 रोजी कार्यालयीन वेळ संपेपर्यंत म्हणजेच 6:00 वाजेपर्यंत किंवा त्यापुर्वी जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद या कार्यालयात पोहोचणे आवश्यक आहे. तद्नंतर प्राप्त झालेल्या मोहरबंद निविदा/दरपत्रकांचा प्रक्रियेत समावेश करण्यात येणार नाही.

हे कार्यालय कोणतेही कारण न सांगता प्राप्त झालेल्या मोहरबंद निविदा/दरपत्रके स्विकारण्याचे किंवा नाकारण्याचे सर्व अधिकार राखुन ठेवत आहे.

आदेशावरुन

02-01-2025

प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय
औरंगाबाद

दिनांक :– 02/01/2025

टिप :–

01) निविदाकारांनी निविदा/दरपत्रक सादर करतांना त्यावर GST/SGST क्रमांक नमुद असलेले तथापी, GST/SGST क्रमांक लागु नसल्यास तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणी क्रमांक नमुद असलेले निविदाकाराच्या लेटर हेडवरील दरपत्रक वैध असतील.
02) निविदाकारांनी निविदा/दरपत्रकासोबत पॅनकार्डची छायांकित प्रत जोडणे बंधनकारक असेल.
03) प्रत्येक निविदाकारास फक्त एक निविदा/दरपत्रक सादर करण्याची परवानगी असेल.
04) खरेदी प्राधिकाऱ्या बरोबर हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत आणि ईच्छुक संस्थेने एकल निविदा देण्याबाबत निविदाकारांना 'हमीपत्र' सादर करावे लागेल.
05) निविदा मान्य करणेबाबतचे अंतिम अधिकार हे निविदा समितीकडे आहेत.